# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 11 January 2026

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ११ जानेवारी २०२६ सकाळी ७.१० मि.

****

- सोमनाथ स्वाभिमान पर्वाचं आज पंतप्रधानांच्या उपस्थितीत आयोजन
- परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमासाठी यंदा चार कोटींपेक्षा अधिक जणांची विक्रमी नोंदणी
- महानगरपालिका निवडणुकीत राजकीय पक्षांकडून आता परस्परांविरोधात पोलिस तक्रारी
- छत्रपती संभाजीनगर इथल्या अकराव्या अजिंठा–वेरूळ चित्रपट महोत्सवाची घोषणा

आणि

- भारत – न्यूझीलंड पहिला एकदिवसीय क्रिकेट सामना आज वडोदरा इथं खेळला जाणार

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी गुजरातच्या दौऱ्यात आज सोमनाथ स्वाभिमान पर्वात सहभागी होणार आहेत. काल ते सोमनाथ इथं दाखल झाले. इसवी सन एक हजार २६ मध्ये सोमनाथ मंदिरावरच्या आक्रमणाचं हजारावं स्मरणवर्ष तसंच स्वातंत्र्यानंतर १९५१ साली झालेल्या या मंदिराच्या जीर्णोद्धाराचं अमृत महोत्सवी वर्षानिमित्त हे पर्व साजरं केलं जात आहे. या पर्वात आज सोमनाथ मंदिर परिसरात होणाऱ्या ओमकार जपात तसंच शौर्य यात्रेत पंतप्रधान सहभागी होणार आहेत. त्यानंतर सोमनाथाची महापूजा केल्यानंतर एका जाहीर सभेलाही ते संबोधित करणार आहेत.

****

परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमासाठी यंदा चार कोटींपेक्षा अधिक जणांनी नोंदणी केली आहे. गेल्या वर्षी गिनीज बुकमध्ये नोंद झालेल्या साडे तीन कोटीपेंक्षा ही संख्या अधिक आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी सामाजिक माध्यमांवरील संदेशात, परीक्षेचा तणाव कमी करणारा हा कार्यक्रम म्हणजे देशव्यापी चळवळ झाल्याचं सांगत, सर्व परीक्षार्थ्यांनी या कार्यक्रमात सहभागी होण्याचं आवाहन केलं.

****

सार्वजनिक आरोग्य विभागात कार्यरत अधिकाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती कामगिरीवर आधारित मूल्यांकन अहवालानुसार पारदर्शकपणे करण्याच्या सूचना सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिल्या आहेत. ते काल मुंबईत या बाबतच्या आढावा बैठकीत बोलत होते. नागरिकांना आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे देण्यासाठी सीएसआर देणाऱ्या संस्थांना प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना आबिटकर यांनी दिल्या.

****

राज्यात महापालिका निवडणुकीच्या प्रचाराने वेग घेतला आहे. प्रचारादरम्यान होणाऱ्या आरोप प्रत्यारोपांसोबतच आता राजकीय पक्षांकडून परस्परांविरोधात पोलिस ठाण्यात तक्रारी दाखल होत असल्याचं दिसून येत आहे.

**

छत्रपती संभाजीनगर इथं MIM च्या उमेदवारासह ११ जणांविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. त्यांच्यावर दुसऱ्या उमेदवाराच्या प्रचारात अडथळे आणल्याचा आरोप आहे.

**

छत्रपती संभाजीनगर इथले भाजप उमेदवार रेणुकादास वैद्य यांचं सोशल मीडिया अकांउंट हॅक झाल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे. या बाबत सायबर पोलिसांकडे तक्रार देखील देण्यात आली आहे.

**

भाजप नेते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन जानेवारी रोजी मुंबई मेट्रोत दिलेल्या मुलाखतीनं आचारसंहितेचा भंग झाल्याची तक्रार काँग्रेसने निवडणूक आयोगाकडे केली आहे. प्रदेश काँग्रेस सरचिटणीस रामकृष्ण शिंदे यांनी ही माहिती दिली.

**

भारतीय जनता पक्षानं पक्षाच्या मुंबई आणि नागपूरमधल्या ५८ पदाधिकाऱ्यांना पक्षविरोधी कारवाया आणि बेशिस्त वर्तणुकीबद्दल सहा वर्षांसाठी निलंबित केलं आहे.

**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी काल छत्रपती संभाजीनगर इथं जाहीर सभेला संबोधित केलं. त्यांच्या हस्ते यावेळी छत्रपती संभाजीनगरसाठीचा वचननामा प्रसिद्ध करण्यात आला. भाजपसह इतर पक्षांच्या ध्येयधोरणांवर ठाकरे यांनी यावेळी टीका केली.

****

बदलापूर लैंगिक शोषण प्रकरणातला सह–आरोपी तुषार आपटे यानं कुळगाव–बदलापूर नगरपरिषदेतल्या 'स्वीकृत' नगरसेवक पदाचा काल राजीनामा दिला. भारतीय जनता पक्षानं परवा त्याची स्वीकृत नगरसेवक म्हणून नियुक्ती केली होती. त्यानंतर विरोधकांनी केलेल्या टीकेनंतर त्याने राजीनामा दिला. वंचित बहुजन आघाडी, काँग्रेस तसंच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, तसंच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानेही या निर्णयावरून भाजपावर कडाडून टीका केली.

****

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून बारावीच्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना उद्या सोमवारपासून ऑनलाईन पद्धतीने हॉलतिकिटे उपलब्ध करून दिली जाणार आहेत. या हॉलतिकिटावर मुख्याध्यापक किंवा प्राचार्य यांचा शिक्का आणि स्वाक्षरी, बंधनकारक असल्याची माहिती राज्य मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी दिली आहे.

****

देशाचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या ६० व्या पुण्यतिथीनिमित्त आज त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. १९६५ साली भारत पाकिस्तान युद्धानंतर रशियात ताश्कंद इथं चर्चेसाठी गेलेल्या शास्त्रीजींचा ११ जानेवारी १९६६ रोजी मृत्यू झाला होता.

****

कायद्याचं उल्लंघन करून सेवा शुल्क आकारल्याबद्दल देशातल्या २७ उपाहारगृहांविरोधात सीसीपीए, अर्थात केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणानं कारवाई केली आहे. या उपाहारगृहांना ५० हजार रुपयांपर्यंत दंड ठोठावण्यात आला असून, आकारलेल्या सेवा शुल्काची रक्कम ग्राहकांना परत करण्याचे आणि आपल्या बिलिंग प्रणालीमध्ये बदल करण्याचे निर्देश सीसीपीएने उपाहारगृह चालकांना दिले आहेत. यात मुंबईतल्या काही रेस्टॉरंटचाही समावेश आहे. ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत, सेवा शुल्काची आकारणी, ही अनुचित व्यापार पद्धत म्हणून घोषित करण्यात आली आहे.

****

वामनभाऊ महाराज यांचे विचार समाजाला आध्यात्म, सदाचार आणि एकोप्याचा मार्ग दाखवणारे तसंच काळाच्या ओघातही सुसंगत असल्याचं, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. बीड जिल्ह्याच्या पाटोदा तालुक्यातल्या गहिनीनाथ गड इथं संत वामनभाऊ महाराजांच्या सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी कार्यक्रमात ते काल बोलत होते. पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, गडाचे महंत विठ्ठल महाराज यांच्यासह बीड आणि अहिल्यानगर जिल्ह्यातले अनेक भाविक यावेळी उपस्थित होते.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या अकराव्या अजिंठा–वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची घोषणा काल करण्यात आली. दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी, महोत्सवाचे संचालक दिग्दर्शक सुनील सुकथनकर तसंच उद्योजक नंदकिशोर कागलीवाल, यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. २८ जानेवारी ते एक फेब्रुवारी दरम्यान छत्रपती संभाजीनगर इथं प्रोझोन मॉलमधल्या आयनॉक्स थिएटरमध्ये हा महोत्सव होणार आहे. जागतिक पातळीवरच्या अनेक कलावंतांच्या उपस्थितीत अनेक चित्रपटांचं प्रदर्शन या महोत्सवात करण्यात येणार आहे.

****

केंद्र सरकारनं नुकतंच विकसित भारत जी राम जी विधेयक संमत केलं. या योजनेमुळे रोजगारांना गती मिळून आर्थिक हातभार चांगला लाभेल अशी अपेक्षा जालना जिल्ह्याच्या घनसावंगी तालुक्यातल्या तिर्थपूरी इथले ओमप्रकाश उढाण यांनी व्यक्त केली. ते म्हणाले –

**बाईट – ओमप्रकाश उढाण**

****

दरम्यान, जालन्याचे काँग्रेसचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी या योजनेच्या मुद्यावरून केंद्र सरकारवर टीका केली. या योजनेतल्या निधीच्या वाटपातही बदल करून राज्यांवर ४० टक्के आर्थिक भार टाकण्यात आल्याने, आर्थिक अडचणीत असलेली राज्यं मनरेगाची कामं राबवू शकणार नाहीत, असं त्यांनी काल वार्ताहर परिषदेत सांगितलं.

****

छत्रपती संभाजीनगरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा पहिला केंद्रीय लोककला महोत्सवाला आजपासून प्रारंभ होत आहे. यात चार रंगमंचावर ११ कलाप्रकार सादर होणार असून ३७७ कलावंत सहभागी होणार आहेत, या महोत्सवात चार जिल्ह्यातल्या संलग्नित महाविद्यालयांचे ६१ संघ, तर विद्यापीठ आणि उपपरिसराचा प्रत्येकी एक संघ असे एकूण ६३ संघ सहभागी होणार आहेत.

****

२१ व्या लोकसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनाचं आज नांदेड इथं आयोजन करण्यात आलं आहे. रविचंद्र हडसनकर यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या या संमेलनात कथाकथन, कविसंमेलन, प्रकट मुलाखत, एकपात्री प्रयोग आदी कार्यक्रम होणार आहेत. सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय तसंच प्रशासकीय सेवेतल्या योगदानासाठी लोकसंवाद पुरस्कारही या संमेलनात प्रदान केले जाणार आहेत.

****

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात तीन एकदिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेला आजपासून सुरुवात होत असून, पहिला सामना वडोदरा इथं खेळला जाणार आहे. दुपारी दीड वाजता सामन्याला सुरुवात होईल. चौदा तारखेला दुसरा सामना राजकोट इथं तर तिसरा सामना १८ तारखेला इंदूर इथं होणार आहे. या मालिकेनंतर दोन्ही संघात पाच सामन्यांची टी ट्वेंटी मालिकाही खेळवली जाणार आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर १४ तसंच १५ जानेवारीला मतदान केंद्रावर अधिकारी तसंच कर्मचाऱ्यांची ने - आण करण्यासाठी एसटी महामंडळ १९० बस देणार आहे. यामुळे या कालावधीत अनेक मार्गावरील बसफेऱ्या रद्द होणार आहेत. प्रवाशांनी याची नोंद घेण्याचं आवाहन एसटीचे विभाग नियंत्रक प्रमोद नेहूल यांनी केलं आहे.

****

राज्यात काल अहिल्यानगर इथं सर्वात कमी साडे आठ अंश तर तर पुण्यात साडे नऊ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. मराठवाड्यात बीड इथं साडे दहा, छत्रपती संभाजीनगर इथं दहा पूर्णांक आठ तर परभणी इथं अकरा अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली.

****